MHDH040007892022

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७५/२०२२</u>

<u>राहुल वसंत पाटील वि.निरंक</u>

## निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदार यांनी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन की, अर्जदार हे मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा जि. धुळे येथील रहिवासी असुन मयत वसंत हरी पाटील हे अर्जदाराचे वडील होते. वसंत हरी पाटील हे दिनांक १७.०८.२०१५ रोजी मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयत वसंत हरी पाटील यांना त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार व इतर आई नामे कोकिळा हरी पाटील, पत्नी नामे वंदना वसंत पाटील, मुली नामे अर्चना रेवानंद गावंडे, भावना स्वप्नील पाटील, निकीता वसंत पाटील व मुलगा नामे राहुल वसंत पाटील असे कायदेशीर वारस असुन वर नमुद व्यतिरिक्त मयतास इतर कोणतेही कायदेशीर वारस नाही.

३. अर्जदार यांना मयत वसंत हरी पाटील यांच्या मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामांसाठी मयत त्यांच्या वारस दाखल्याची आवश्यकता भासत आहे. वसंत हरी पाटील यांच्या मृत्युपश्चात वर नमुद अर्जदार व इतर हे त्यांचे कायदेशीर वारस असुन त्यांचे नावाने वारस दाखला देण्यात यावा यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. अर्जदाराने अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.१० वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुनरउल्लेख केला असुन वसंत हरी पाटील हे अर्जदाराचे वडील होते व त्यांच्या मृत्युपश्चात त्यांना वर नमुद अर्जदार व इतर हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्जदाराने अर्जासोबत यादी अनुक्रमे निशाणी क्र. ३ सोबत मयत वसंत हरी पाटील यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत व अर्जदार व इतर यांच्या आधारकार्डांची पडताळणी केलेल्या प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत.

६.        अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'दैनीक वार्ता' यामध्ये दिनांक ०४.११.२०२२ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मुदतीत किंवा आजपर्यंत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

७.        वरील पुरावा व कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदार व इतर हे मयत वसंत हरी पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच दाखल कागदपत्रांवरुन अर्जदार व इतर हे मयताची आई, पत्नी व मुले असुन त्यांच्या मृत्युपश्चात त्यांना वर नमुद अर्जदार व इतर यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही अन्य कायदेशीर वारस नाहीत. त्यांच्या पुराव्याची विश्वासार्हता बाधित होईल याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही.

८.        प्रस्तुत अर्जात अर्जदाराने मयताच्या नावे कोणतीही स्थावर अथवा जंगम संपत्तीचे वर्णन नमुद केलेले नाही व केवळ शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची अवश्यकता असल्याचे नमुद केले आहे. त्याप्रमाणे अर्जदार व इतर यांना शासकीय व निमशासकीय कामकरीता मयताच्या वारसांना ते वारस असल्याबाबत घोषीत करुन मागीतल्यास त्याप्रमाणे त्यांना वारस प्रमाणपत्र देता येईल. त्यामुळे दाखल पुराव्यावरुन अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे मयताचे अर्जदार व इतर हे अर्जामधील नमुद कारणांकरीता कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र त्यांचे लाभात देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करतो.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदाराच्या मागणी प्रमाणे वसंत हरी पाटील यांच्या मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामांसाठी अर्जदार व इतर आई नामे कोकिळा हरी पाटील, पत्नी नामे वंदना वसंत पाटील, मुली नामे अर्चना रेवानंद गावंडे, भावना स्वप्नील पाटील, निकीता वसंत पाटील व मुलगा नामे राहुल वसंत पाटील हे कायदेशीर वारस असल्याने त्याचे नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र आवश्यक न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AVINASH WAMANRAO KSHIRSAGAR
Date: 2022.12.15 17:20:18 +0530

(अविनाश डब्ल्यु क्षिरसागर )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दोंडाईचा.

दिनांकः– १५.१२.२०२२

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – १५.१२.२०२२ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.